**इयत्ता १० वी व १२ वी मधील शालांत व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत विशेष गुणांसह प्रविण्य मिळविणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस योजना.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-शाआशा-२०१९ /प्र.क्र.२२८/का.१३.**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : १६ जुलै, २०१९

**वाचा:-** १) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे पत्र क्रमांक-शाआशा-२००३/प्र.क्र.१७७७/ का.६(३), दि.२० जून, २००३

२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.बीयुडी/पूरक मागण्या/प्र.क्र.४२/का.७, दि.०८ ऑगस्ट, २००३

३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.शाआशा-२००३/प्र.क्र.१०१/का.१३, दि.१४ ऑगस्ट, २००३

**प्रस्तावना:-**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा व त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळून गुणवत्तेबाबत विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण व्हावी यासाठी राज्यातील आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणा-या आदिवासी शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील इ.१० वी व १२ वी मधील शालांत व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत विशेष गुणांसह प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यासाठी बक्षिसपर योजना वाचा येथील संदर्भ क्रमांक ३ येथे नमूद शासन निर्णयाअन्वये सुरू करण्यात आली आहे. सदर योजना आता, शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळा बरोबरच नामांकित शाळा, एकलव्य निवासी शाळा व इतर शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्याना लागू करण्याची व त्यासाठी बक्षिस रक्कम निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय</u>:-**

१. संदर्भ क्रमांक ३ अन्वये लागू करण्यात आलेली शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळांमधील इ.१० वी व १२ वी मधील शालांत व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत विशेष गुणांसह प्राविण्य मिळविणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी प्रोत्साहनपर बक्षिस योजना आता नामांकित शाळा, एकलव्य निवासी शाळा व इतर शाळांमध्ये इ.१० वी व १२ वी मध्ये विशेष प्राविण्य मिळविणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनांही लागु करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेअन्वये शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, नामांकित शाळा व एकलव्य निवासी शाळा व सर्वसाधारण शाळांमधील इयतेत १० वी व १२ वी मधील अनुसुचित जमातीचे प्रथम ५ मुले व ५ मुली यांना माध्यमिक शालांत परीक्षा व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेतील गुणवत्तेनुसार रोख स्वरूपात बक्षिस देण्यात येईल. यासाठी प्रथम क्रमांक रू.३०,०००/- दुसरा क्रमांक रू.२५,०००/- तृतीय क्रमांक रू.२०,०००/- चतुर्थ क्रमांक रू.१५,०००/- व पाचव्या क्रमांकास रू.१०,०००/- असे बक्षिसाचे स्वरूप राहिल. यासाठी एकुण रू.२०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर योजना ही पूर्वीप्रमाणेच आयुक्त, आदिवासी विकास यांच्या स्तरावर राबविण्यात येईल.

३. सदरचा खर्च मुख्यलेखाशिर्ष मागणी क्रमांक टी-४ २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गियांचे कल्याण-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना-०२-अनुसूचित जमातींचे कल्याण २७७-शिक्षण (१२) १० वी व १२ वी मधील शालांत परिक्षेत विशेष गुणांसह प्राविण्य मिळविणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस योजना (१२) (०१) राज्य योजनांतर्गत योजना (२२२५-३४१-१) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१६१६४८०२१७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2019.07.16 16:53:44 +05'30'

**( सु. ना. शिंदे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.४०० ०३२.
३. मा.मंत्री (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
४. सर्व मा. मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.
६. सर्व मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. सर्व मा. विधानसभा सदस्य.
८. सर्व मा. विधानपरिषद सदस्य.
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१३. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१४. सर्व जिल्हाधिकारी.
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक
१६. अपर आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नागपूर / नाशिक/ ठाणे / अमरावती.
१७. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१८. महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
१९. महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
२०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२१. सर्व मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा, आदिवासी विकास विभाग (प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फत).